बीड वर्ष १ अंक ४५ गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ Reg.No. MHMAR/25/A4846 dailysatyawadi@gmail.com पाने-४ किंमत ५ रूपये




दैनिक आपल्या लोकांचा
# सत्यवादी
संपादक : शेख रेहान www.esatyawadi.com मो. 9822728340




# हवालदाराच्या मनात आले तर प्रदीप फाटेला दुबई फाट्यावरुन घेवून येईल!

## नवरा गमावून न्याय मागण्यासाठी उपोषणास बसलेल्या पत्नीलाच गुन्हा दाखल करण्याची धमकी

**बीड । सत्यवादी**

बीडचे कर्तव्यदक्ष जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांच्या प्रकरणाला एक महिना उलटून गेला तरी आरोपी प्रदिप फाटे पोलिसांना सापडत नाही. न्यायालयानेही फाटेचा जामीन फेटाळला असून पोलिस यत्रणा मात्र हातावर हात देवून बसली आहे. फाटेंना आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत असा फार्स चालू आहे. तब्बल एक महिन्यानंतर जाधवर कुटूंबियांना न्याय मिळत नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी थेट आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आणि बुधवारी



जाधवर कुटूंबियांसाठ नातेवाईक पोलिस अधिक्षक कार्यालया समोर उपोषणाला बसले मात्र त्यांनी उपोषण करू नये म्हणून पोलिस अधिकारीच त्यांना गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत होते. उपोषण कर्त्यांना या ठिकाणी मंडपही टाकू दिला नाही त्यामुळे त्यांना अक्षरश: उन्हात बसावे लागले. शेवटी पोलिस उपअधिक्षक पुजा पवार यांनी सोमवार पर्यंत आरोपीला अटक करू असे ठोस आश्वासन दिल्यानंतरच जाधवर कुटूंबियांनी उपोषण सोडले.

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यामध्ये अनेक

(पान २ वर...)

## महिना झाला तरी फाटे सापडेना



**पोलिसांची माणूसकी हरवली काय?**

पोलिस अधिकाऱ्याकडून आरोपी असल्याची वागणुक मिळाली. या ठिकाणी महिला, लहान मुले, वृध्द उपोषणाला बसले होते. त्यांना सावली करावी म्हणून बीड शहरातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी मंडप टाकण्याची व्यवस्था केली. मात्र पोलिसांनी हा मंडप टाकू दिला नाही. तुम्हाला उपोषण करायचे असेल तर जिल्हाधिकारी कार्यालया समोर करा असे सांगितले. तर बीड शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बल्लाळ यांनी आम्हाला तपासासाठी वेळ द्या आमचे लक्ष विचलित करू नका नाही तर आम्हाला तुमच्यावरच गुन्हे दाखल करावे लागतील अशी धमकी दिली.


# नवरी मांडवात अन् उपस्थिती दवाखान्यात!

## तालुका आरोग्य अधिकाऱ्याच्या मर्जीमुळे महिला कर्मचाऱ्यांची मस्टरवर हजेरी

**शिरूर । सत्यवादी**

तालुक्यातील उपकेंद्रांत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत गंभीर अनियमितता झाल्याचे आरोप समोर येत आहेत. तत्कालीन तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष अनुपस्थित असतानाही मस्टरवर उपस्थित दाखवून त्यांचा पगार काढल्याचा आरोप होत आहे.

(पान २ वर...)



समुदाय आरोग्य अधिकारी यांचे हजेरी पत्रक दि. 01/06/2022 ते 30/06/2022

| अ.क्र. | उपकेंद्र | कर्मचारी नाव | पद |
|---|---|---|---|
| 1 | घाटशीळ पारगाव | डॉ.प्रशांत पद्माकर पारगावकर | CHO |
| 2 | घोगस पारगाव | डॉ.विजय उत्तम राठोड | CHO |
| 3 | मातोरी | डॉ.विनोद अंकुश हुंबे | CHO |
| 4 | लोणी | डॉ.गणेश भीमराव पांगरे | CHO |
| 5 | उखंडा च. | डॉ.प्रणीत प्रतापराव भोंडवे | CHO |
| 6 | राक्षसभुवन | डॉ.शैला रामराव देशमुख | CHO |
| 7 | जाटनांदूर | डॉ. स्नेहा पांडुरंग माडे | CHO |
| 8 | गोमळवाडा | डॉ. अजिंक्य अशोकराव गवाड | CHO |

वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र शिरूर का.

**नेमके आरोप काय?**

- लग्नाच्या सुट्टी दरम्यानही उपस्थिती दाखवली.
- प्रत्यक्ष कामावर नसतानाही मस्टरवर सही
- अधिकाऱ्यांच्या संगनमतातून पगार मंजूर

# राज्यसभेसाठी प्रितम मुंडेंचे नाव चर्चेत

**बीड । सत्यवादी**

राज्यसभेच्या जवळपास ३७ जागा रिक्त होत आहेत. यापैकी ७ जागा महाराष्ट्रातील आहेत. राज्यसभेच्या महाराष्ट्रातील सात जागांच्या अनुषंगाने आता घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नावावर चर्चा करण्यासाठी मंगळवारी मुंबईत भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे.



या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह भाजपाचे आदी दिग्गज नेते उपस्थित होते. यावेळी भाजपाकडून राज्यसभेसाठी नावं निश्चित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना भाजपा नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी

(पान २ वर...)

# कुंपनच शेत खावू लागले

## अध्यक्षांनीच घेतली बँकेची वाट लावायची सुपारी!

**बीड । सत्यवादी**

जिल्ह्यातील एका नामांकित बँकेच्या अध्यक्षांनीच बँकेची वाट लावायची सुपारी घेतली असन २५०० ते २८०० रूपये किंमत असलेला भुखंड बँकेच्या ऑफीससाठी तब्बल ३८०० रूपयाला घेवून यात लाखाचा घपला या अध्यक्ष महाशयांनी केला असल्याची चर्चा बँकेत होत आहे.




बीड जिल्ह्यातील नामांकित बँक ज्या बँकेच्या राज्यभर शाखा आहेत. हजारो गोरगरीब ठेविदारांच्या जीवावर मोठ्या झालेल्या या बँकेच्या अध्यक्षांनी मात्र बँकेची स्वत:च वाट लावायचे ठरवले असल्याचे दिसत असून एका तालुका शाखेसाठी एक मोठा भुखंड खरेदी केला आहे. ज्या भुखंडाची किंमत आजु बाजुच्या लोकांना विचारले असता २५०० ते २८०० रूपयांच्या वर स्केअर फुटाचा भाव या भागात नसल्याचे समजले मात्र या अध्यक्ष महाशयांनी हा भुखंड तब्बल ३८०० रूपये स्केअर फुटा प्रमाणे बँकेस घेवून यात लाखोंचा घपला केला असल्याचे बोलले जात आहे. अध्यक्षच जर असे करत

(पान २ वर...)

### नोकर भरतीही बोगसच


एका संचालकांची मर्जी सांभाळण्यासाठी गेल्या दोन महिन्यांपूर्वी याच बँकेत नोकर भरती झाली असून याची जाहिरात कधी प्रसिध्द झाली. परिक्षा कधी व कोणत्या कंपनी मार्फत घेण्यात आली. आणि किती जणांनी ही परिक्षा दिली हे ही कुठेही उघड न होता केवळ भरती झालेले कर्मचारी बँकेत दिसले आणि त्यांच्या ट्रेनिंगही सुरू झाल्याचे चित्र पहायला मिळाले.

# मोदींना इस्त्रायलमधले १२०० बळी दिसले, मात्र ते फिलीस्तीनचे ८० हजार मेलेले लोक विसरले!

**नवी दिल्ली । सत्यवादी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नऊ वर्षांनंतर पुन्हा इस्रायलच्या दौऱ्यावर गेले आहे. इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू आणि त्यांच्या पत्नीने विमानतळावर पंतप्रधानांचे हार्दिक स्वागत केले आणि त्यांना विशेष गार्ड ऑफ ऑनर दिला. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी इस्रायली संसदेला संबोधित केले. यावेळी मोदी म्हणाले की, ''भारतीय जनतेच्या वतीने मी तुम्हाला शुभेच्छा देतो. संसदेला संबोधित करणारा हा माझ्यासाठी पहिला भारतीय पंतप्रधान असण्याचा अभिमानाचा क्षण आहे. मला पुन्हा येथे येऊन खूप आनंद झाला आहे.'' पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणाले की, 'भारतीय जनतेच्या वतीने मी ७ ऑक्टोबर रोजी झालेल्या भयानक हमास दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक जीवितहानीबद्दल शोक व्यक्त करतो.

(पान २ वर...)



# कांद्याचे भाव घसरले!



**बीड । सत्यवादी**

कांद्याचं आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याचे सरासरी दर १ हजारच्या खाली म्हणजे ५०० ते ६०० पर्यंत आल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यांनी कांद्याचे लिलाव बंद पाडले आहेत.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार,

(पान २ वर...)

# स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या सचिव पदी सुनील क्षीरसागर

**बीड । सत्यवादी**

अहिल्यानगर-बीड-परळी वैद्यनाथ या रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळावी तसेच शहरी भागासह ग्रामीण भागामध्ये रेल्वे कामात निर्माण होणे अडथळे प्रशासकीय पातळीवर बैठका घेणे त्याचबरोबर निधी संकल्पसाठी निवेदने सादर करणे यासह अन्य



न्याय हक्कासाठी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. या समितीच्या नूतन कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी जवाहरलाल सारडा यांची नियुक्ती झालेली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २५)

(पान २ वर...)

# मिना बाजारचे जाहीर प्रगटन देऊन टेंडर काढा!

**बीड । सत्यवादी**

दरवर्षी रमजान निमित्ताने लावण्यात येणारा मिना बाजार हा यावर्षीही नगर परिषद मार्फत जाहीर प्रगटन देऊन जाहीर लिलाव टेंडर करुनच देण्यात यावा, सदर मिना बाजार हा राजुरी वेस, बशीरगंज ते अशोक टॉकीज पर्यंत मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्या परवानगीने कर आकारणी करुन दिला जातो. यावर्षीही जाहीर प्रगटन देऊन लिलावाद्वारे हे टेंडर काढण्यात यावे, कोणत्याही राजकीय दबावापोटी, शिफारशीने कोणालाही हे टेंडर देऊ नये, यात लिलावाची रक्कम भरण्याची प्रक्रिया पुर्ण नियमाप्रमाणे करण्यात

(पान २ वर...)

# गरीबांच्या उरावर टिच्चून सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ!



**मुंबई । सत्यवादी**

गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना म्हणजेच सरकारी नोकरी करणाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता नेमका कधी मिळणार? असे विचारले जात होते. दरम्यान, आता राज्यातील सर्व शासकीय कर्मचारी तसेच पात्र कर्मचाऱ्यांना मोठी खुशखबर मिळालेली आहे. आता सरकारने अशा कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्क्यांची वाढ

(पान २ वर...)

# खळेगाव संरपचाविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर!

## अशोक शिंदेने केला लाखोंचा भ्रष्टाचार



**गेवराई । सत्यवादी**

खळेगाव ग्रामपंचायत निवडणूक डिसेंबर २०२२ मध्ये जनतेतून निवडून आलेले संरपच नऊ सदस्य व दहावा सरपंच असताना संरपच पद येताच काही दिवसांपासून संरपच हे अडानी असल्याचा गैरफायदा घेत ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे याने कारभार पाहात लाखो रूपये

(पान २ वर...)

# विविध प्रश्नांविषयी आ.संदिप क्षीरसागरांनी घेतली महसुल मंत्री, बांधकाम मंत्र्यांची भेट

## अप्पर तहसिल कार्यालय तसेच राजुरी-खरवंडी राष्ट्रीय महामार्गाचा प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी


**बीड । सत्यवादी**

बीड विधानसभा मतदार संघातील विविध प्रश्नांविषयी आ.संदिप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची बुधवारी (दि.२५) रोजी मुंबई येथे भेट घेतली.

बीड विधानसभा मतदार संघातील चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबत राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर

(पान २ वर...)





दैनिक आपल्या लोकांचा

# सत्यवादी

26 फेब्रुवारी गुरुवार 2026



## संपादकीय...

# वैद्यकीय शिक्षण; अवघड जागेचे दुखणे

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशांतील घसरत्या गुणवत्तेची दखल थेट सर्वोच्च न्यायालयाला घ्यावी असे वाटले हे उत्तम झाले. वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रता गुणांमधील घट, त्यावरून सुरू असलेला वाद, सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी या सगळ्यातून आतापर्यंत अनेकदा टाळलेला प्रश्न भारतीय शिक्षण व्यवस्थेला पुन्हा एकदा जाचू लागल्याचे दिसते. तो म्हणजे व्यवहार सांभाळण्यासाठी गुणवत्तेस किती सैल सोडायचे. सर्वच पातळ्यांवरचा हा प्रश्न वैद्यकीय शिक्षणाबाबत अवघड जागचे दुखणे ठरणारा आहे.

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दोन प्रवेश फेऱ्यांनंतरही जवळपास १८ हजार जागा यंदा रिक्त राहिल्या. महाविद्यालये आहेत, पायाभूत सुविधा आहेत मग जागा फुकट का दवडा असा फक्त व्यावहारिक पातळीवरील विचार करून वैद्यकीय परीक्षा मंडळाने प्रवेश पात्रता गुणांचा निकष शिथिल केला. त्यानुसार ८०० पैकी १०३ गुण खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी, ९० गुण अपंग विद्यार्थ्यांसाठी आणि उणे ४० गुण अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी असे नवे निकष लागू केले. परीक्षा, पात्रता, चाचणी अशा सगळ्याच संकल्पनांना धुळीस मिळवणाऱ्या या नव्या निकषांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले नसते तरच नवल. त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयानेही यामुळे गुणवत्तेवर काय परिणाम होतो हे तपासणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात फक्त रिक्त जागा भरण्याला प्राधान्य द्यावे की गुणवत्ता सिद्ध करणारे मनुष्यबळ निवडून त्यांना अधिक शिक्षित करावे या प्रश्नाकडे अखेरीस व्यवस्थेला पाहावे लागणार आहे.

वैद्यकीय शिक्षण हे देशातील सर्वाधिक स्पर्धा असलेले आणि अत्यंत खर्चीक. वैद्यकीय पदवी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १० ते १२ टक्केच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो. प्रवेश परीक्षेसाठी किमान दोन वर्षे तयारी, त्यानंतर लाखो रुपयांचे शुल्क भरून पदवीचे शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झालेल्यांना पुढील शिक्षणासाठी पात्रता सिद्ध करायची गरज काय असा प्रश्न प्रवेश पात्रता गुण कमी करण्याचे समर्थन करताना शासन विचारते. वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट–पीजी' ही पात्रता तपासण्यासाठी नाही, तर स्पर्धा अधिक असल्याने इच्छुकांची क्रमवारी ठरवण्यासाठी आहे, असे शासनाचे म्हणणे आहे. मात्र, प्रवेश परीक्षेत विचारण्यात येणारे प्रश्न हे वैद्यकीय अभ्यासक्रमावरीलच असतील तर अशा परीक्षेत उणे गुण किंवा अत्यल्प गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या डॉक्टरकी करण्याच्या क्षमतेवर, त्यांच्या पदवी शिक्षणाबाबतच प्रश्न उपस्थित करणारे ठरत नाही का याचा विचार करण्याची गरज शासनास वाटत नाही. यातील दुसरा मुद्दा हा अधिक रोकडा आणि व्यावहारिक.

शासकीय महाविद्यालयांमध्ये खासगी महाविद्यालयांच्या तुलनेत कमी शुल्कात शिक्षण मिळते. खर्च आणि शुल्क यातील फरक हा करदात्यांच्या पैशातूनच चुकता होतो. पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी येणारे डॉक्टर हे त्या रुग्णालयाची प्राथमिक स्तरावरील मनुष्यबळाची गरज भागवतात. मग जागा रिक्त ठेवून आर्थिक नुकसान करून घ्यावे का, असा विचार महाविद्यालय–संचालक धार्जिणी व्यवस्था करते. त्यातूनच पात्रता निकष कमी करण्याचा अ–शैक्षणिक निर्णय घेतला जातो. मात्र छोटीशी चूक/अकार्यक्षमता ही करदात्याच्या जिवावरच उठणारी असेल तर वैद्यकीय क्षेत्रातील मनुष्यबळाची भरती किंवा निवड ही फक्त जागा भरण्याची किंवा नगाला नग उभा करण्याची प्रक्रिया असू शकत नाही, या मूलभूत गोष्टीचा विसर व्यवस्थेला पडलेला दिसतो. व्यावहारिक किंवा आर्थिक समतोलासाठी गुणवत्तेशी तडजोड समर्थनीय ठरू शकत नाही.

त्याच वेळी जागा का रिक्त राहतात याकडे पाहावे लागेल. बहुतेक जागा या पात्र डॉक्टरांच्या अभावामुळे नाही; तर विशिष्ट अभ्यासक्रम पात्र विद्यार्थी नाकारत असल्यामुळे रिक्त आहेत. बाजारपेठीय आकर्षणे, विद्यार्थ्यांना करावी लागणारी आर्थिक गुंतवणूक हे याचे मूळ. रेडिओलॉजी, डर्मेटॉलॉजी (त्वचारोग), मेडिसिन अशा शाखांना विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद आहे. गेल्या काही वर्षांपासून शल्यचिकित्सा, मेंदुरोग, हृदयरोग, बालरोग अशांसारख्या जटिल, अधिक आव्हानात्मक शाखांपेक्षा विद्यार्थ्यांचा कल भविष्यातील धावपळ तुलनेने कमी असेल अशा शाखांकडे वाढता आहे. यामागील सामाजिक कारणाकडे दुर्लक्ष करून चालणारे नाही.

अलीकडे डॉक्टरांवर होणारे हल्ले, विविध कारणांसाठी त्यांना जबाबदार धरण्याचा वाढू लागलेला कल यामुळे अनेक विद्यार्थी जेथे समाजाचा फारसा संबंध येणार नाही आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार नाही अशा शाखा निवडतात. त्वचारोग, किरणोत्सारी उपचार, औषधशास्त्र इत्यादी शाखांस अधिक मागणी आहे ती यामुळे. दुसरा मुद्दा प्रवेशासाठी कराव्या लागणाऱ्या आर्थिक तरतुदीचा. हा आणखी एक प्रश्न. वैद्यकीय पदवी असो किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम गुणवत्ता असूनही, प्रवेश परीक्षेत ती सिद्ध करूनही शुल्क भरण्याची क्षमता नाही म्हणून प्रवेश न घेणारे अनेक विद्यार्थी दिसतात.

पान १ व ४ वरुन...

## हवालदाराच्या मनात आले तर

प्रकार घडत आहेत. मात्र पोलिसांना त्याचा तपास लागत नाही. एक कर्तव्यदक्ष आणि हुशार जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांचा धुळे सोलापूर हायवेच्या जवळ कपीलधार पाटी जवळ कारमध्ये संशयास्पदरित्या मृतदेह सापडला. कुटूंबियांना कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दबाव आणल्यानेच हा घातपात झाला असल्याचा संशय होता. त्यामुळे त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल करायला पाच दिवस लावले. ज्यावेळी सचिन जाधवर यांचा मृत्यू झाला त्यावेळी फाटे हा बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात आला होता. मात्र वातावरर खराब होईल या नावाखाली त्याला पोलिसांनीच पळवून लावल्याचे बोलले जात आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर दोन दिवसात त्याला अटक करणे अपेक्षित होते मात्र महिना उलटला तरी फाटे पोलिस यंत्रणेला सापडत नाही. या प्रकरणी पोलिसांनी फाटेंना अटकपूर्व जामिनासाठी संधी दिली मात्र न्यायालयाने जामीन फेटाळल्याने त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक करणे अपेक्षित होते मात्र फाटे सापडत नाही असे पोलिस सांगतात. पोलिसांनी मनात आणले तर एखादा हवालदारही फाटेला दुबाई फाट्यावरून आणु शकतो. मात्र पोलिस अधिक्षकांची इच्छा पाहिजे. पोलिस यंत्रणा कामाला लावल्याचे पोलिस सांगतात. मात्र तरीही फाटे सापडत नाही. यातच पोलिस यंत्रणेचे अपयश आहे. फाटे एक महिना झाला तरी सापडत नसल्याने शेवटी हतबल होवून सचिन जाधवर कुटूंबियांनी बुधवारी पोलिस अधिक्षक कार्यालया समोर उपोषण केले. मात्र त्यांना पोलिस अधिकाऱ्याकडून आरोपी असल्याची वागणुक मिळाली. या ठिकाणी महिला, लहान मुले, वृध्द उपोषणाला बसले होते. त्यांना सावली करावी म्हणून बीड शहरातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी मंडप टाकण्याची व्यवस्था केली. मात्र पोलिसांनी हा मंडप टाकू दिला नाही. तुम्हाला उपोषण करायचे असेल तर जिल्हाधिकारी कार्यालया समोर करा असे सांगितले. तर बीड शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बल्लाळ यांनी आम्हाला तपासासाठी वेळ द्या आमचे लक्ष विचलित करू नका नाही तर आम्हाला तुमच्यावरच गुन्हे दाखल करावे लागतील अशी धमकी दिली. यांना आरोपी सापडत नाही हे अपयश लवपण्यासाठी उलट लोकशाही मार्गाने न्याय मागणाऱ्या फिर्यादींनाच अटक करण्याची धमकी हे पोलिस देतात. नेमके लोकशाही राज्य आहे की हुकूमशाही अशी संतप्त प्रतिक्रीया ठिकाणी उपस्थितांकडून येत होत्या. उपोषण कर्त्यांची भेट घेवून पोलिस अधिक्षकांनी त्यांना ठोस आश्वासन देणे आवश्यक होते. मात्र पोलिस अधिक्षकांना त्यांना भेटण्यातही कमीपणा वाटला. शेवटी पोलिस उपअधिक्षक पुजा पवार यांनी भेटून उपोषण कर्त्यांना भेटून सोमवार पर्यंत आरोपीला अटक करू असे ठोस आश्वासन दिल्याने उपोषण कर्त्यांनी सोमवार पर्यंत उपोषण स्थगित केले.

## नवरी मांडवात अन्

विशेषतः महिला कर्मचारी देशमुख यांच्या बाबतीत हा प्रकार उघडकीस आल्याचे सांगितले जात आहे. संबंधित कर्मचारी स्वतःच्या लग्नाच्या सुट्ट्यांवर असताना आणि लग्नाच्या दिवशीही प्रत्यक्ष हजर नसतानाही, मस्टरवर उपस्थिती दाखवून त्यांचा पूर्ण महिन्याचा पगार काढण्यात आल्याचा आरोप आहे.

समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या हजेरी पत्रक ०१/०६/२०२२ ते ३०/०६/२०२२ नुसार महिला कर्मचारी देशमुख या १५ /०६/२०२२ पासून २९/०६/२०२२ रोजी पर्यंत गैरहजर होत्या. त्यात २१ जून रोजी लग्नाची हळद तसेच २२ जून रोजी लग्न असल्या कारणाने महिला कर्मचारी सुट्टीवर असतांना देखील तत्कालीन आरोग्य अधिकारी यांनी महिलेची उपस्थिती दाखवत गैरप्रकार घडवल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणात तालुका आरोग्य अधिकारी आणि संबंधित कर्मचारी यांच्यात संगनमत असल्याची चर्चा आरोग्य विभागात सुरू आहे. स्थानिक नागरिक व काही आरोग्य कर्मचारी यांच्या म्हणण्यानुसार, हा प्रकार केवळ एका कर्मचाऱ्यापुरता मर्यादित नसून, संपूर्ण तालुक्यातील काही उपकेंद्रांमध्ये उपस्थिती व पगाराबाबत गैरप्रकार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रशासनाकडून चौकशीची मागणी**

या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी व संबंधित वरिष्ठ प्रशासनाने तातडीने चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. सरकारी निधीचा अपव्यय आणि सेवाभावी आरोग्य यंत्रणेची प्रतिमा मलिन करणाऱ्या या प्रकाराची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. जर आरोप सिद्ध झाले, तर संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून शासनाच्या पैशांची वसुली करावी, अशीही मागणी पुढे येत आहे. आरोग्य सेवा ही ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जीवनरेषा आहे. अशा अनियमितता जर खऱ्या असतील, तर याचा थेट परिणाम सामान्य रुग्णांवर होतो. मग प्रश्न उपस्थित होतो की, सरकारी यंत्रणेत पारदर्शकता आणि जबाबदारी कोण ठरवणार? आता सर्वांचे लक्ष जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले आहे. चौकशी होणार का? दोषींवर कारवाई होणार का? की हे प्रकरणही दडपले जाणार? जनतेला आता मात्र उत्तर हवे आहे.

## राज्यसभेसाठी प्रितम

एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'राज्यसभेसाठी प्रीतम मुंडेंचं नाव चर्चेत असून बाकी निर्णय पक्षाचे नेते घेतील', असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.

**पंकजा मुंडे काय म्हणाल्या?**

''राज्यसभेसाठी अनेक नावे चर्चेत आहेत. त्या नावांपैकी एक नाव प्रीतम मुंडे यांचं देखील आहे. कारण त्या देखील या आधी खासदार होत्या. पण यावेळी पक्षाच्या आदेशानुसार मी (पंकजा मुंडे) लोकसभा लढवली होती. त्यानंतर प्रीतम मुंडे यांनी पक्षाचं काम केलं, तसेच त्यांनी खासदार म्हणून देखील काम केलेलं आहे. आता प्रीतम मुंडे यांच्या नावाबरोबरच आणखी काही नावं देखील चर्चेत आहेत. त्यामुळे आता बाकी निर्णय आमच्या पक्षाचे सर्व नेते घेतील अशी आमची अपेक्षा आहे'', असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.

**भाजपाच्या बैठकीत काय चर्चा झाली?**

या बैठकीत विनोद तावडे, रामदास आठवले, रावसाहेब दानवे, प्रीतम मुंडे, विजया रहाटकर आणि भागवत कराड यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांच्या नावांवर चर्चा झाली. बैठकीत काही इतर नावांचाही विचार करण्यात आला. सूत्रांचे म्हणणे आहे की, पर्याय निवडताना पक्ष अनुभव, निष्ठा आणि प्रादेशिक प्रतिनिधित्वाचा विचार करत आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या नेत्यांनी आपली मते मांडल्याचे समजते. राज्य पातळीवर कोणताही अंतिम निर्णय झाला नसला तरी सुचविलेल्या नावांची एक यादी तयार करण्यात आली आहे. ही यादी आता दिल्लीतील भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली जाईल. शिफारसींवर चर्चा करण्यासाठी रविंद्र चव्हाण लवकरच राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची भेट घेण्याची शक्यता आहे. अंतर्गत चर्चेनंतर केंद्रीय नेतृत्वच अंतिम निर्णय घेईल, असे सांगण्यात आले आहे.

## कुंपनच शेत खावू लागले

असतील तर कर्मचारीही मागे राहणार नाहीत आणि या बँकेवर गोरगरीब जनतेने ठेवलेल्या विश्वासास तडा जाण्यास काही उशीर लागणार नाही. गेल्या वर्ष दोन वर्षात अध्यक्षांच्या घपल्यामुळे जिल्ह्यात आधीच अनेक पतसंस्था, बँका बंद पडलेल्या आहेत. जिल्ह्यातील अनेक ठेविदासरांचे पैसे यामुळे बुडालच्याचे चित्र निर्माण झाले आहे. अशा तच या नामाकिंत बँकेच्या अध्यक्षांनी असे उद्योग सुरू केले असून या बँकेच्या ठेविदारांच्या जीवावर मोठी झालेली ही बँक बुडवायची सुपारी अध्यक्षांनीच घेतली की काय अशी चर्चा सध्या सर्वत्र होत आहे.

## स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी

बैठक संपन्न झाली.या बैठकीत सर्वानुमते दैनिक चंपावती पत्र चे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड ची बीड शहरामध्ये समितीचे सदस्य अरुण डाके यांचे निवासस्थानी बुधवारी बैठक संपन्न झाली. यावेळी अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, अशोक म. शेटे, शिवाजी बन्सी जाधव, सय्यद नवीदुजम्मा, रवी उबाळे, अरुण बाबासाहेब डाके, महम्मद लईक अहेमद, भास्करराव जाधव, तुकाराम साळुंके, विलासराव बडगे, वाय जनार्दन राव, सखाराम मस्के, वैभव स्वामी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील नगर – बीड – परळी या जिव्हाळ्याच्या रेल्वे मार्गासाठी दैनिक चंपावती पत्र चे संपादक स्व. नामदेवराव क्षीरसागर यांनी लेखणीच्या माध्यमातूनच स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड माध्यमातून रस्त्यावर उतरून आंदोलनासह प्रशासकीय पातळीवर देखील भरीव कामगिरी करत बीडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य केले होते. या बैठकीमध्ये त्यांच्या कार्याचा उल्लेख करत उपस्थित त्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत आणि समितीच्या आजपर्यंतच्या कार्याचा अनुभव असणारे त्यांचे चिरंजीव दैनिक चंपावती पत्र चे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिव पदी नियुक्ती करण्याचा ठराव मांडण्यात आला. यासाठी समितीचे सदस्य विलासराव बडगे यांनी ठराव मांडला यास अरुण डाके आणि वाय जनार्दन राव यांनी अनुमोदन देत सर्वानुमते ठराव पास करत सचिव पदी सुनील नामदेव क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल उपस्थितांनी सुनीलराव क्षीरसागर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या

प्राध्यापकांकडून केल्या जाणाऱ्या कामाची जबाबदारी देण्यात टाकण्यात येते, ही बाब याचिका कर त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तासिका तत्त्वावर कार्यरत असले तरी या अटी व जबाबदाऱ्यांमुळे हे अध्यापक इतर ठिकाणीही काम करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या रोजगार मिळवून पैसे कमवण्याच्या मूलभूत हक्काची पायमल्ली होते. तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांना या बदल्यात ताशी नाममात्र ४०० ते ८०० रुपये मानधन देण्यात येत आहे. याउलट नियमित प्राध्यापकांना समान कामाच्या मोबदल्यात दोन लाखांहून अधिक मासिक वेतन व इतर भत्ते आणि लाभ देण्यात येत आहेत. तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्तीपत्रातील पूर्णवेळ उपस्थितीच्या अटींवर बोट ठेवून सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जाब विचारला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने तीन ते दहा वर्ष किंवा त्याहून अधिक काळ तासिका तत्त्वावर पूर्णवेळ नियुक्त अध्यापकांना न्याय मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आसाम राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमधील अर्धवेळ कार्यरत अध्यापकांच्या नियमितीकरणाची याचिका सर्वोच्च न्यायालयामध्ये सध्या प्रलंबित आहे. सदर याचिकेचा दाखला देत याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील निखिल गोयल, ॲड. नितीन लोणकर, ॲड. सोनाली सूर्यवंशी व ॲड. प्रज्ञा भेके यांनी युक्तिवाद केला.

## हिंगणीच्या लेकीची कबड्डीत

कबड्डी स्पर्धेत उत्कृष्ट संघभावना, चपळाई आणि जिद्दीच्या जोरावर विद्यार्थिनींनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करत विजेतेपद मिळवले. ग्रामीण भागातील शाळेतून विभागीय स्तरावर पोहोचण्याची ही अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे.या यशाबद्दल केंद्रप्रमुख शेख जलिल सर, मुख्याध्यापक आंधळे सर, ढवळे सर, धन्वे मॅडम, कुलकर्णी मॅडम, मोराळे मॅडम, कुरुंद सर, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हनुमंत तांदळे, सरपंच संतोष तांदळे, मुंडे वामनराव आणि मौजे हिंगणी खुर्द येथील सर्व ग्रामस्थांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.विभागीय स्पर्धेतही अशीच दमदार कामगिरी करून शाळा व गावाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा केंद्र प्रमुख शेख जलील सर,मुख्याध्यापक आंधळे सर व सहकारी शिक्षक यांच्या तर्फे व्यक्त केली जात आहे.

## आज अश्वांच्या

आहे. रैवाल चालीवरील घोड्यांच्या स्पर्धांची सुरुवात परळी वैजनाथ येथेच झाली. यापूर्वी अशा स्पर्धा प्रामुख्याने माळेगाव येथे गॅलपिंग प्रकारात होत असत. मात्र, त्या स्पर्धांमध्ये अपघातांचे प्रमाण अधिक असल्याने डॉ. चौधरी यांनी सुरक्षित रैवाल चालीवरील स्पर्धांची संकल्पना सुरू केली.

डॉ. चौधरी यांच्याकडे 'मयूर' नावाचा अत्यंत उत्कृष्ट घोडा होता. त्याच्या मदतीने त्यांनी अनेक उल्लेखनीय कामगिरी केल्या. त्यांच्या उक्कडगाव येथील शेताजवळ तळ ठोकून बसलेल्या, पुणे पोलिसांना हवे असलेल्या दरोडेखोरांना पकडण्यातही या घोड्याची मदत झाली होती. या घोड्याशी डॉ. चौधरी यांचे अतूट नाते होते.

परळी वैजनाथ येथे अश्वसंवर्धन आणि सुरक्षित घोडेस्वारीला चालना देण्याच्या उद्देशाने या स्पर्धा आयोजित करण्यात येत असून, परिसरातील अश्वपालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विविध प्रश्नांविषयी आ.संदिप क्षीरसागरांनी

बानवकुळे यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदन दिले. चौसाळा हे गाव शहरापासुन सुमारे ४० कि.मी. अंतरावर आहे. बीड तालुक्याचा मोठा भाग हा चौसाळा परिसराशी जोडलेला आहे. परंतु नागरिकांना महसुल व प्रशासकीय कामांसाठी बीड शहराकडे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. या पार्श्वभुमीवर प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता यावी. लांबच्या गावांना कमी अंतरात शासकीय सेवा मिळावी. शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व सर्वसामान्यांना दिलासा मिळावा. महसुल विभागाची कार्यक्षमता वाढावी या उद्देशाने चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय तातडीने सुरू करण्याची मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. त्यावर मा.मंत्री महोदयांनी सदरील विषयावर सकारात्मक भुमिका दर्शवत लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित केले.

यासोबतच बीड विधानसभा मतदारसंघातील खरवंडी ते नवगण राजुरी दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे विस्तारीकरण, मजबुतीकरण तसेच आवश्यक त्या ठिकाणी भुसंपादन करण्याचे काम सन २०१८ मध्ये मंजुर झालेले आहे. परंतु संबंधित कंत्राटदाराने सदरील काम अंदाजपत्रकानुसार न करता अत्यंत निकृष्ठ दर्जाचे करून अर्धवट सोडले आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. पादचायांना, ग्रामस्थांना तसेच प्रवाशांना दैनंदिन प्रवासात प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, रस्त्यालगत राहणाया नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. यासोबतच या रस्त्यासाठी ज्यांनी स्वत:च्या जमिनी दिल्या आहेत त्या शेतकयांना आजपर्यंत योग्य मोबदला (मावेजा) मिळालेला नाही. अनेकवेळा संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून ही न्याय मिळत नसल्याने शेतकयांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची भेट घेऊन हा महत्वाचा प्रश्न मांडला आहे.

## खळेगाव संरपचाविरुद्ध

भ्रष्टाचार केला आहे. कोणतीही ग्रामसभा मासिक सभा बॉडीची मिटिंग न घेता सदस्य यांना विश्वासात न घेता पद आले कि नुसता लाखोंचा भ्रष्टाचार केला आहे.

अधिकारी हताशी धरून लाखो रूपये भ्रष्टाचार केल्याप्रकरणी ग्रामपंचायत उप संरपच सचिन आहेर सह सदस्य यांनी तहसील गेवराई येथे सौ.पदमाबाई शामराव कर्हे यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव दाखल केला . तहसीलदार खोमने साहेब यांच्या अध्यक्षतेखाली सभा बोलवली आसता. संरपच पदमाबाई शामराव कर्हे यांच्या विरुद्ध आठ/दोन आसा अविश्वास ठराव मंजूर झाला. परंतु संरपच पद हे जनतेतून निवडून आल्याने पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप साहेब यांच्या अध्यक्षतेखाली २३/०२/२०२६ रोजी ग्रामसभांना बोलवली या ग्रामसभेत नागरीकानी गुप्त मतदान प्रक्रिया घ्या म्हणून अर्ज केला व अध्यक्ष यांनी गुप्त मतदान प्रक्रिया राबवली ११–५ पर्यंत मतदान घेतले व पाच ला निकाल प्रक्रिया सुरू केली यात अविश्वास ठरावाच्या बाजूने ४०२ तर अविश्वास ठरावाच्या विरूद्ध ८२ मते पडले तर ७ मते बाद झाले. ३२० मताने ठराव पारीत होत. संरपच सौ.पदमाबाई शामराव कर्हे यांचे संरपच पदाचे सर्व अधिकार खारीस झाले व उप संरपच यांना पदभार गेला. अशोक शिंदे यांनी मीच संरपच आहे असं मिरवत भष्टाचार केला प्रकरणी उप सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी दोन वेळेस अविश्वास ठराव आणून पारीत केला हे जिल्ह्यातील पहिले प्रकरण आसंल.

## मोदींना इस्त्रायलमधले १२००

प्रत्येक कुटुंबाप्रती माझ्या संवेदना आहेत. आम्ही तुमचे दुःख समजतो.हमासचे नाव घेत पंतप्रधान मोदींनी दहशतवादाविरुद्ध आवाज उठवला. मोदी म्हणाले की, निष्पाप नागरिकांची हत्या सहन केली जाणार नाही. दहशतवादाला शून्य सहनशीलता असली पाहिजे. जगाने त्याविरुद्ध एकजुटीने भूमिका घेतली पाहिजे. भारत पूर्ण आत्मविश्वासाने इस्त्रायलसोबत खंबीरपणे उभा आहे.' मोदींना इस्त्रायलमध्ये १२०० बळी गेलेले दिसले, मात्र इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात पॅलिस्टीनमध्ये ८० हजार लोकांचा गेलेला बळी दिसला नाही, याबद्दल त्यांनी चकार शब्दही काढला नाही. निदान माणुसकी म्हणून तरी फिलीस्तीनबद्दल मोदींनी बोलायला पाहिजे होते, अशा भावना व्यक्त होतांना दिसत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणाले की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने मंजूर केलेला गाझा शांतता उपक्रम हा एक चांगला मार्ग आहे. भारताने यासाठी आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या प्रदेशातील सर्व लोकांसाठी, पॅलेस्टिनी समस्येच्या निराकरणासह, न्याय्य आणि चिरस्थायी शांततेचे प्रयत्न सुरू आहेत. शांतीचा मार्ग नेहमीच सोपा नसतो, परंतु या प्रदेशात संवाद, शांती आणि स्थिरतेसाठी भारत तुमच्या आणि जगासोबत उभा आहे.

## कांद्याचे भाव घसरले!

आज त्यांना ५०० ते ६०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे, तर चार दिवसांपूर्वी हाच दर ११ रुपये प्रति किलो (११०० रुपये प्रति क्विंटल) होता, जो आता अवघ्या ७ रुपये प्रति किलो (७०० रुपये प्रति क्विंटल) झाला आहे. कांद्याला ३ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळाल्यासच शेती परवडेल, असे शेतकरी सांगतात. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी खूप अडचणीत आले आहेत. सरकारच्या धोरणांमुळे, विशेषतः व्यापाऱ्यांची निर्यात सबसिडी ५०% नी कमी केल्याने, बाजारभाव पडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी आता कमी भावात विकल्या गेलेल्या कांद्यासाठी १५०० रुपये अनुदान आणि ३ हजार रुपये हमीभावाची मागणी केली आहे.

## मिना बाजारचे जाहीर

यावी, असे न झाल्यास नगर परिषदेच्या विरोधात उपोषण व आत्मदहन करण्याचा इशारा समाजसेवक बशीरुज्जमा खान यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

## गरीबांच्या उरावर टिच्चून सरकारी

केली आहे. त्यामुळे तशी माहिती वित्त राज्यमंत्री आशिस जयस्वाल यांनी सांगितले आहे. या निर्णयानुसार आता महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून ५८ टक्के करण्यात येणार आहे. गरीब मरत असतांना सरकार मात्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करुन गरीबांच्या जखमेवर मीठ चोळण्याचेच काम सरकारने केले आहे.

वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानपरिषदेत तसे निवेदन सादर केले आहेयासंदर्भात वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज विधान परिषदेत निवेदन सादर केले. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शासकीय कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. महागाई भात्यातील ही वाढ जुलै २०२५ पासून लागू करण्यात येणार आहे. जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील थकबाकीची रक्कम मार्च २०२६ मध्ये अदा करण्यात येईल. तसेच नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील थकबाकीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येणार आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार या निर्णयाचा लाभ सुमारे ५.९६ लाख कार्यरत शासकीय कर्मचारी तसेच ८.१२ लाख निवृत्तीवेतनधारकांना होणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक बळ मिळून त्यांच्या कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. हा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासन कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून राज्यातील सर्व घटकासोबत राज्य शासनाच्या आर्थिक सुरक्षिततेस ही प्राधान्य देत असल्याचे वित्त राज्य मंत्री आशिष जयस्वाल यांनी म्हटले. दुसरीकडे राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना ही खुशखबर मिळालेली असताना दुसरीकडे केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठीही आठव्या वेतन आयोगाचे काम चालू झाले आहे. लवकरच आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांचा पगार वाढणार आहे.

## जि.प.त लोकप्रतिनिधी

जॉन्सन यांच्याकडे केली आहे.

मागील काही वर्षांपर्यंत जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने जिल्हा परिषद बांधकाम विभाग या निधीचा हवा तसा वापर करत असल्याचे निदर्शनास येत आहे. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने १० लाख आणि ७ लाख अशा दोन प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. यातील एका कामाचे स्वरूप पंचायत समिती आवारातील अधिकारी कर्मचारी निवासस्थानांची संरक्षण भिंत बांधणे असे आहे.या कामाची रक्कम ९ लाख ९९ हजार ८९५ रुपये इतकी आहे तर जिल्हा परिषद नविन प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व विविध कामे करणे या कामासाठी ६ लाख ८६ हजार २७१ रुपयांची प्रशासकीय मान्यता अर्थात कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

## मर्जीतील कंत्राटदार पोसण्यासाठी

एक छोटी फर्निचरची खोली करण्यात येणार आहे.व विविध कामांमध्ये जिल्हा परिषदेच्या गेट समोरील मोकळ्या जागेत तारेचे कंपाऊंड आणि हिरवळ करण्यात येणार आहे मात्र मुळात निवडण्यात आलेली जागाच चुकीची असुन लोकप्रतिनिधी नसल्याने आणि केवळ प्रशासकीय राज असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असल्याचे दिसून येत असुन संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी याबाबत सीईओ जितिन रहेमान आणि जिल्हाधिकारी नवनित कांवत यांना लेखी तक्रारी द्वारे अनावश्यक बाबी टाळुन आवश्यक त्या ठिकाणी निधीचा वापर करण्याची विनंती केली आहे.

## अत्याचार प्रकरणातील

आला. सदर प्रकरणात फिर्याद दाखल होऊन सुमारे नऊ महिन्यांचा कालावधी लोटला आहे. दरम्यान, पीडिता ही सध्या सज्ञान असल्याचे समोर आले असून आरोपी व पीडितेने परस्पर संमतीने विवाह केला आहे. दरम्यान, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड येथील दिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जोशी यांनी आरोपीस जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड. वर्षा भिमराव दळवी यांनी बाजू मांडली, तर त्यांना ॲड. मनीषा दळवी यांनी सहकार्य केले.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना छतावर मंडपात

प्रकरणात शिक्षण विभागाने मोठी कारवाई केली आहे. विभागाने कडक पाऊल उचलत थेट परीक्षा केंद्र संचालक अभिषेक राऊत यांना निलंबित केले आहे. दुसरीकडे, संस्थेने देखील अभिषेक राऊत यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा आणि नियमांचा विचार न करता चक्क शाळेच्या छतावर मंडप टाकून विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवण्याचा धक्कादायक प्रकार बीडमध्ये समोर आला होता. या गंभीर प्रकरणाची दखल घेत शिक्षण विभागाने मोठी कारवाई केली आहे. कुर्ला येथील यशवंत विद्यालय केंद्राचे संचालक अभिषेक राऊत यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर मनमानी करणाऱ्या संस्थाचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## पिकांचे पंचनामे करण्यासाठी

प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके आडवी पडली असून उत्पादन घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे गरजेचे असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. महसूल व कृषी विभागामार्फत नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शासनाकडे नुकसान भरपाईचा प्रस्ताव त्वरित सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील बाधित भागांचा तातडीने आढावा घेऊन पंचनाम्यांचे काम जलदगतीने पूर्ण करावे तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश संबंधित विभागांना देण्यात यावेत, अशी अपेक्षा खासदार सोनवणे यांनी व्यक्त केली आहे. अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असेही पत्रात म्हटले आहे.

## मनोज जरांगे पाटील

त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात संबंधित मंत्र्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे, असेही त्यांनी म्हटले. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घेणे आवश्यक असून, नव्या समितीच्या माध्यमातून प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात हैदराबाद गॅझेटीयरच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेसाठी राज्य सरकारने अखेर नवी समिती स्थापन केली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती काम करणार असून प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेली संपूर्ण कार्यपद्धती निश्चित करण्याची जबाबदारी या समितीकडे देण्यात आली आहे. मराठा आंदोलनादरम्यान आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी हैदराबाद गॅझेटीयरच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करून प्रमाणपत्र देण्याची मागणी केली होती. त्यानंतर राज्य सरकारने ही प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही यासाठी स्पष्ट नियम आणि प्रक्रिया निश्चित करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे आता ही समिती स्थापन करून प्रमाणपत्र वितरणाचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे.

## मराठवाड्याच्या ग्रामीण भागात ५ लाख ३९

अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विभागातील एकल महिलांमध्ये विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता तसेच ४० वर्षांपुढील अविवाहित महिलांचा समावेश आहे. या महिलांचे प्रश्न गंभीर असून प्रशासनाच्या माध्यमातून त्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांच्या संख्येचे अचूक आकलन व्हावे, यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले आहे. जिल्हा परिषदांमार्फत अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात आले असून आठ जिल्ह्यांतील ग्रामीण भागात ४ लाख ९३ हजार ४५० महिलांची नोंद झाली आहे.

दै.आपल्या लोकांचा सत्यवादी दि.२६/०२/२०२६

**CHANGE IN NAME**

I Declare by this Publication about Change in my name

OLD NAME :- **SHAIKH MOHAMMED AZHARODDIN**

NEN NAME:- **SHAIKH MOHAMMED AZHARUDDIN GAYASODDIN**

Address:- **Opp. Zam Zam Colony, Beed. Maharashtra - 431122. Mob:- 9850374606**

# विवाह संस्थेच्या माध्यमातून रेशीम गाठी बांधणारे सामाजिक कार्यकर्ते सुभाष ढवळे

**आष्टी । सत्यवादी**

मुळगाव जामखेड तालुक्यातील हळगांव परंतु सुरुवातीपासूनच सामाजिक कार्याची आवड असल्याने श्रीगोंदा येथे स्थायिक होऊन विवाह जुळविण्याचे काम करणारे सुभाष ढवळे यांनी आतापर्यंत पर्यंत दिड हजारांवर विवाह जुळवून दिले आहेत. विवाह इच्छुकांच्या रेशीम गाठी बांधणारे सुभाष ढवळे यांना या सामाजिक कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते अनेक पुरस्कारही मिळाले आहेत तसेच ठिकठिकाणी सत्कारीत करण्यात आले आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या आठ ते दहा वर्षांपासून मुलांचे विवाह जुळणे अवघड होऊन बसले आहे. आज प्रत्येक गावात विवाह इच्छुक तरुणांची संख्या प्रचंड आहे. परंतु श्रीगोंदा येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष ढवळे यांनी विवाह मंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत दिड हजारांवर विवाह जुळवून दिले आहेत. त्यांच्या या महत्त्वाच्या सामाजिक कार्याबद्दल आतापर्यंत अनेक सामाजिक कार्याचे पुरस्कार मिळाले आहेत.

श्रीगोंदा येथील व गोरगरिबांसाठी झटणारा खरा सामाजिक कार्यकर्ता सुभाष ढवळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत आजपर्यंत सर्वधर्मीय मुला-मुलींचे १६०० शुभविवाह जमविले आहेत. दोन्हीही घरांचे मिलन माणुसकी जपण्याचे काम ढवळे वधु वर सूचक मंडळाच्या माध्यमातून ते करतात. श्री सुभाष ढवळे यांना प्रहार दिव्यांग संघटना अहिल्यानगर आणि जय मल्हार फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्य यशवंत सेना सरसेनापतीचे संस्थापक अध्यक्ष माधव गडदे, अहिल्यानगर यशवंत सेना जिल्हा अध्यक्ष श्री विजय तमनर, आमदार संग्रामभैय्या जगताप यांचे बंधू श्री सचिनभैय्या जगताप, खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशन जिल्हाप्रमुख श्री राजेंद्र पोकळे या सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते श्री सुभाष ढवळे यांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात आला.



सुभाष ढवळे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, अहिल्यानगर शहराचे आमदार संग्रामभैय्या जगताप, श्रीगोंदाचे विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते, सांगली पंचायत समितीच्या माजी सदस्या अनिताताई कदम तसेच रयत शेतकरी संघटना सातारा जिल्हाध्यक्ष संजय लाड, जामखेड तालुक्यातील हळगावचे मा. उपसरपंच आबासाहेब ढवळे यांच्यासह महाराष्ट्रातील अनेकांनी सुभाष ढवळे यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत विधानपरिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांनी एका लग्न सोहळ्यानिमित्त सुभाष ढवळे यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली तसेच सुभाष ढवळे यांच्या सामाजिक कार्याबद्दल प्रा.ना. राम शिंदे यांनी तोंड भरून कौतुक केले. ढवळे वधू वर संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष सुभाष ढवळे यांच्या हस्ते मा. सभापती राम शिंदे यांचा विशेष सन्मान सत्कार करण्यात आला.

# शिष्यवृत्ती परीक्षेत जनता विद्यालयाचे आठ विद्यार्थी उत्तीर्ण



**धारूर । सत्यवादी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल जाहीर झाला असून येथील जनता माध्यमिक विद्यालयाचे एकूण आठ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परी षदेमार्फत घेण्यात आलेल्या आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत येथील जनता माध्यमिक विद्यालयाचे एकूण सोळा विध्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी आठ विध्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये बांगर सोहम रमेश, जाधव ईश्वरी, विश्वजीत पवार, गायत्री सिरसट, ओंकार नाईकवाडे, प्रियांका लांडगे,युवराज खटके व समाधान तोंडे हे विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावी पर्यंत एक हजार रुपये प्रति महिना याप्रमाणे बारावी पर्यंत शिष्यवृत्ती मिळणार असून या शिष्यवृत्तीचा फायदा या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी होणार आहे. विध्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रशालेच्या मुख्याध्यापिका सीमा गायकवाड यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी शरद उबाळे, सचिवपदी बाबा तिबोले

**धारूर । सत्यवादी**

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती (तिथीनुसार) यांची बैठक दिनांक २२ फेब्रुवारी रोजी पार पडली. या बैठकीत अध्यक्षपदी शरद उबाळे तर सचिवपदी बाबा तिबोले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.





दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजयंती उत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्याचा निर्धार समितीने केला आहे. यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणून छत्रपती शिवाजी महाराज चौकात नयनरम्य विद्युत रोषणाई, भव्य आतिषबाजी तसेच १०० कलाकारांचे भव्य ढोल पथक सादर करण्यात येणार आहे.

ही बैठक शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व तालुका संघटक बंडू बप्पा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेनेचे माजी शहरप्रमुख अजितदादा शिनगारे यांच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीस मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून यंदाचा शिवजयंती उत्सव अधिक भव्य व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# शाळा ही विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देणारे क्षेत्र व्हावे-गोविंद मुंडकर

**नांदेड । सत्यवादी**

सध्याच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात मुलांना केवळ शैक्षणिक यश नव्हे, तर उत्तम संस्कार मिळणेही तितकेच आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शाळेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून शाळा ही विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देणारे क्षेत्र व्हावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार गोविंदराव मुंडकर यांनी केले.

ते बिलोली येथील सरस्वती प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. मुंडकर पुढे म्हणाले की, "आपला मुलगा किंवा मुलगी चांगल्या मार्गाने जावी, त्यांना चांगले संस्कार लाभावेत यासाठी आई-वडील नेहमीच प्रयत्नशील असतात. मात्र मुलांना चांगले संस्कार देणे ही केवळ पालकांचीच जबाबदारी नसून शाळांचीही तेवढीच जबाबदारी आहे. शिक्षणासोबतच मूल्यशिक्षण दिल्यास विद्यार्थी जीवनात नक्कीच यशस्वी ठरतात." विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले, "जीवनात सगळ्यांना विसरा, पण आई-वडील आणि चांगले गुरु यांना कधीही विसरू नका. या तीन व्यक्तींना केवळ तुमच्या उत्कर्षात आणि प्रगतीतच



आनंद मिळतो. त्यामुळे आयुष्यात त्यांचा सन्मान आणि कृतज्ञता कायम ठेवावी, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष देविदास गीते महाराज यांची तर व्यासपीठावर बिलोलीच्या माजी नगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका सौ. मैथिली ताई कुलकर्णी, नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष अनुप अर्जुनराव अंकुशकर, नगरसेवक यशवंत गादगे, अमजद चाऊस, नगरसेविका गिरजाबाई मेडेकर, शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मणराव इरवंत खेमशेट्टे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलची उज्ज्वल परंपरा कायम

## एनएमएमएस परीक्षेत ९ विद्यार्थी उत्तीर्ण

**धारूर । सत्यवादी**

श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांनी नॅशनल मीन्स कम मेरिट स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेची शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या या परीक्षेत शाळेतील तब्बल ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये चि. सार्थक दशरथ ठोंबरे, कु. स्नेहल राजाभाऊ चाटे, कु. साक्षदा विठ्ठल नाटकर, कु. रूपाली आसाराम वजीर, चि. सुलतान कलीम शेख, कु. अनुदिनी विनोद गरडे, चि. राजकुमार राजेंद्र शेळके, कु. अस्मिता रघुनाथ वाव्हळ आणि चि. रोहन किसन लोखंडे यांचा समावेश आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक सौ. सिरसट मॅडम, सौ. गोरे मॅडम, सौ. सावंत मॅडम, श्री. पिलाटो सर व श्री. शाहू सर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. सत्कारप्रसंगी शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब राठोड, संचालिका सौ. राठोड, शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

# स्पर्धा परीक्षेत महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे घवघवीत यश

**परळी । सत्यवादी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ८ वर्गाच्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एनएमएमएस) परीक्षेत महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित चार शाळेतील ४० विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत घवघवीत यश संपादन केले.

ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था असलेल्या महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र विद्यालय मोहा ता-परळी येथील १२, आसुबाई विद्यालय मांडेखेल येथील ९, सांडेश्वर विद्यालय चनई ता-अंबाजोगाई येथील ८ तर गोदावरी विद्यालय मंजरथ ता-माजलगाव येथील ११ असे ४० विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले. महाराष्ट्र शिक्षण संस्था सातत्याने विद्यार्थी गुणवत्तेबाबत प्रयत्नशील राहिलेली असून स्पर्धा परिक्षबाबत जाणीवपूर्वक काम करत असते. राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेतील यश हे या कामाची फलश्रुती होय. या परीक्षेत पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी १२ हजार रुपये असे चार वर्षे ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळत असते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव व सर्व संचालक मंडळाने चार ही शाळेतील यशस्वी विद्यार्थी, त्याचे मार्गदर्शक शिक्षक व शालेय प्रशासनाचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनच्या राज्य कार्यकारिणीची घोषणा

## डॉ.शेख असलम आणि डॉ.सानिया शेख यांच्याकडे महत्त्वपूर्ण जबाबदारी

**बीड । सत्यवादी**

आयुष क्षेत्रातील डॉक्टरांच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी कार्यरत असलेल्या आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन च्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.भूषण नगरे सर यांनी डॉ. शेख असलम यांची राज्य अध्यक्षपदी, तर डॉ. सानिया असलम शेख यांची राज्य उपाध्यक्षपदी निवड केली आहे.विशेष म्हणजे, वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या या पती-पत्नी जोडीची एकाच वेळी राज्यस्तरावरील महत्त्वाच्या पदांवर निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. डॉ. भूषण नगरे यांनी या निवडीची घोषणा करताना सांगितले की, आयुष डॉक्टरांचे संघटन बळकट करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी ऊर्जावान नेतृत्वाची गरज होती. डॉ. शेख असलम यांचा दांडगा जनसंपर्क आणि डॉ. सानिया शेख यांचा संघटनात्मक कार्याचा अनुभव लक्षात घेता ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.आपल्या निवडीनंतर बोलताना डॉ. शेख असलम म्हणाले, "संस्थेने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत महाराष्ट्रातील प्रत्येक आयुष डॉक्टरला संघटनेशी जोडणे आणि त्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढणे हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट राहील. तर डॉ. सानिया शेख यांनी महिला डॉक्टरांच्या सहभागावर आणि सक्षमीकरणावर भर देणार असल्याचे स्पष्ट केले.एकाच घरात दोन महत्त्वाची पदे आल्याने वैद्यकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. या निवडीबद्दल संघटनेचे पदाधिकारी, विविध रुग्णालयांचे संचालक आणि समाजसेवकांनी या दांपत्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. आगामी काळात ही जोडी राज्यातील आयुष डॉक्टरांच्या हितासाठी मोठी क्रांती घडवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पटेल परिवार कडुन पण जोरदार सत्कार करण्यात आला आहे.



# आरोग्य विभाग उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड यांच्या शिरपेचात मानाचा तुरा

## ना.मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानीत

**बीड । सत्यवादी**

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना अंतर्गत राज्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या परिमंडळस्तरीय व जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांना वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात आला आहे.



यावेळी उपसंचालक आरोग्य सेवा लातूरच्या डॉ.रेखा गायकवाड यांनाही या कार्यक्रमात उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्काराने सन्मानीत करण्यात आल्या आहेत. ना. मेघना बोर्डीकर यांच्यासह इतर मान्यवर व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला आहे. राज्यामध्ये उत्कृष्ट आरोग्य सेवा पुरविणाऱ्या संस्था, अधिकारी व कर्मचारी यांचा दरवर्षी शासना मार्फत वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात येतो. दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान राबविण्यात आले. अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हा व परिमंडळ स्तरावर एका महिला नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. या अभियाना अंतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्या राज्यातील एका परिमंडळ स्तरीय नोडल अधिकाऱ्याची आणि तीन जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांची कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात आला. यामध्ये लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड यांचाही काल सन्मान करण्यात आला आहे. डॉ. रेखा गायकवाड यांना उत्कृष्ट कार्याबद्दल मिळालेल्या पुरस्काराचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# एनएमएमएस परीक्षेत समर्थ विद्यालय सिरसमार्गचे यश

**गेवराई । सत्यवादी**

या शाळेतून चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात संस्थेचे सचिव मा . सुभाषराव पवळ यांच्या मार्गदर्शनाखाली एनएमएमएस या इयत्ता आठवीच्या परीक्षेत एकूण १७ विद्यार्थी पैकी चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शाळेतील विद्यार्थिनी कुमारी नंदिनी लक्ष्मण जाधव, संस्कृती भास्कर रडे, शुभांगी अशोक टाकसाळ व विद्यार्थी श्रेयस संतोष परदेशी या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. दरवर्षाप्रमाणे याही वर्षी समर्थ विद्यालय शिरसमार्ग या शाळेतून एन एम एम एस परीक्षेत उत्तीर्ण होऊन शाळेचा बहुमान वाढविला आहे. अभ्यासातील सातत्य, चिकाटी,कठोर परिश्रम करण्याच्या तयारी, व अचूक मार्गदर्शन या गोष्टी मुळे कोणतेही यश संपादन करता येते हे या निकालावरून लक्षात येते.त्याबद्दल संस्थेचे सचिव मा.सुभाषराव पवळ, शाळेचे मुख्याध्यापक मा. केसभट सर, तांबारे सर,शिंदे सर, जमदाडे सर,काशीद सर, टाकसाळ सर, दाभाडगावकर सर, आहेर सर,कारंडे सर,कात्रजकर सर, मगर सर, खोसे सर व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.






दैनिक आपल्या लोकांचा
# सत्यवादी
गुरुवार 26 फेब्रुवारी 2026


# वकिलास मारहाण प्रकरणी धारूर वकील संघाचा कामकाजावर बहिष्कार

**धारूर । सत्यवादी**

बीड येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात अँड राम पांडुरंग डोंगरे यांना दाब दडपशाही करून त्यांच्यावर विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा विचार करणाऱ्या नागरिकावर कठोर कारवाई करावी अशी मागणी धारूर तालुका वकील संघाच्या वतीने करून कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला.



बीड येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात अँड राम पांडुरंग डोंगरे यांना शिवीगाळ करून अँट्रॉसिटी व विनयभंग दाखल करण्याचा आरोप राधाकिसन रामचंद्र करपे यांनी व इतर पाच ते सहा जणांनी घातला व त्यांना मारहाण केली याप्रकरणी तात्काळ यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी करत न्यायालयाच्या कार्यालयीन अधीक्षक निवेदन देऊन धारूर तालुका वकील संघाने दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकला व तात्काळ या वकिलास मारहाण करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी धारूर तालुका वकील संघाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# जि.प.त लोकप्रतिनिधी नसल्याने अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

## जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधीचा हवा तसा वापर –डॉ.गणेश ढवळे



**बीड । सत्यवादी**

सर्वोच्च न्यायालयाने अनिश्चित काळासाठी राज्यातील उर्वरित जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मर्जी पुढील काही महिने राहणार असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असुन जनतेच्या पैशातून अनावश्यक कामांसाठी निधी देऊन मर्जीतील कंत्राटदार पोसण्याचे काम सुरू असल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत अनावश्यक बाबी ऐवजी अत्यावश्यक बाबींसाठी निधी खर्च करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे सीईओ जतिन रहेमान आणि जिल्हाधिकारी विवेक

(पान २ वर...)

### मर्जीतील कंत्राटदार पोसण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले का?

जिल्हा परिषदेत २०२३ पासुन प्रशासक असल्याने आधिका–यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही.त्यामुळे अधिकारी मर्जीतील कंत्राटदार पोसण्यासाठी निधी खर्च करताना दिसत आहेत. एकीकडे जिल्हा परिषदेच्या मुख्य ईमारतीला संरक्षण भिंत नाही जी होती पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ ती पाडण्यात आली. वास्तविक पाहता ही भिंत तातडीने बांधणे आवश्यक आहे.मात्र असे न करता पंचायत समितीतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाला संरक्षण भिंत बांधण्याचा घाट आधिका–यांनी घातला आहे.

जिल्हा परिषद आवारात ज्या ठिकाणी लाईटचे मीटर आहे त्याठिकाणी

(पान २ वर...)

# पिकांचे पंचनामे करण्यासाठी खा.बजरंग सोनवणेंचे पत्र

**बीड । सत्यवादी**



जिल्ह्यात २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे विविध भागांतील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे त्वरित करण्यात यावेत, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. यासंदर्भात २५ फेब्रुवारी रोजी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे.

पत्रात म्हटले आहे, अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला आहे. अचानक झालेल्या पावसामुळे शेतपिकांचे मोठ्या

(पान २ वर...)

# दहावीच्या विद्यार्थ्यांना छतावर मंडपात बसवणं भोवलं; केंद्र संचालक निलंबित

**बीड । सत्यवादी**

कुर्ला येथील यशवंत विद्यालयातील परीक्षा केंद्रावर दहावीच्या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था चक्क शाळेच्या छतावर मंडप टाकून केल्याचा धक्कादायक प्रकार दहावी पेपरच्या सुरुवातीस समोर आला होता. याप्रकरणी शिक्षण विभागाने गंभीर दखल घेऊन केंद्र संचालकास निलंबित केले आहे.



बीडमध्ये कॉपीमुक्त अभियान सुरू आहे. कॉपी प्रकरणावरून शिक्षण विभागाने १७ शिक्षकांना आतापर्यंत निलंबित केले आहे. यामुळे धाबे दणाणले असतानाच कुर्ल्यातील यशवंत विद्यालयात घडलेल्या प्रकार राज्यभर चर्चेचा विषय ठरला. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मंडप टाकून इमारतीच्या छतावर बसवण्यात आले होतेया

(पान २ वर...)

# अत्याचार प्रकरणातील आरोपीने लग्न केले; जामीन मंजूर!

**बीड । सत्यवादी**

अत्याचार प्रकरणातील आरोपीस न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ३ मे २०२५ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास पीडिता ही नेहमीप्रमाणे मैत्रिणींसोबत गावातील शिवणकला वर्गासाठी घरातून निघाली होती. मात्र दुपारी साडेबारा वाजेपर्यंत मुली घरी परतल्या नाहीत. यामुळे कुटुंबीयांनी शोध घेण्यास सुरुवात केली.



दरम्यान, पीडितेची पुतणी रडत घरी परत आली. तिच्याकडे चौकशी केली असता तिने सांगितले की, त्या शिवणकला वर्गाकडे जात असताना पांढऱ्या रंगाची, काळ्या काचा असलेली स्कॉर्पिओ गाडी त्यांच्या जवळ थांबली. त्या गाडीतून ओळखीचा मुलगा आकाश सतीश कांबळे (रा. मांजरसुभा, ता. जि. बीड) खाली उतरला आणि त्याने पीडितेला गाडीत बसवून नेले. कुटुंबीयांनी गावात शोध घेतला, मात्र पीडिता सापडली नाही. त्यानंतर पीडितेच्या आईने बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक १२७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात

(पान २ वर...)

# मनोज जरांगे पाटील यांचा पुन्हा अल्टिमेटम

## जीआर काढला, पण अंमलबजावणी का नाही?

**मुंबई । सत्यवादी**

मराठा आरक्षणाच्या संदर्भात सरकारने लवकरात लवकर कार्यवाही केली नाही, तर जून महिन्यात पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले किंवा त्यांना आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, तर कोणाच्याही विनंतीकडे लक्ष दिले जाणार नाही, असे

(पान २ वर...)



# तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या याचिकेची सुप्रीम कोर्टाकडून दखल

**मुंबई । सत्यवादी**

महाराष्ट्रातील सुमारे ४२ शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये तीन ते दहा वर्षांपासून तासिका तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या मात्र पूर्णवेळ आणि नियमित अध्यापकांच्या जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या अध्यापकांच्या याचिकेवर सुनावणी करतेवेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले. राज्यातील तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांना नियमित करण्याची याचिका उच्च



न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोव्हेंबर महिन्यामध्ये फेटाळली होती. त्याविरुद्ध संबंधित याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती. महाराष्ट्रामध्ये शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर नियुक्तीवेळी संबंधित उमेदवारांना पूर्णवेळ सदर महाविद्यालयांमध्ये हजर राहण्याची अट घातली जाते. तसेच, सदर अध्यापकांवर पूर्णवेळ, कायमस्वरूपी व नियमित

(पान २ वर...)




# मराठवाड्याच्या ग्रामीण भागात ५ लाख ३९ हजार एकल महिला

**संभाजीनगर । सत्यवादी**

मराठवाडा विभागात एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विशेष उपक्रम सुरू केला आहे. विभागातील एकल महिलांची अचूक संख्या निश्चित करण्यासाठी सर्व आठ जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्वेक्षणात ४ लाख ९३ हजार ४५० एकल महिला आढळून आल्या आहेत. नागरी भागातील एकल महिलांचे सविस्तर सर्वेक्षण करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या सक्षमीकरण कार्यक्रमासाठी विभागीय महिला व बाल विकास उपायुक्त यांची विभागीय नोडल

(पान २ वर...)

# हिंगणीच्या लेकीची कबड्डीत दमदार झेप ;विभागीय स्पर्धेसाठी निवड

**चौसाळा । सत्यवादी**

बीड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावल्यामुळे हिंगणी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनीची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

(पान २ वर...)



# आज अश्वांच्या धावण्याच्या स्पर्धा



**परळी । सत्यवादी**

मयूर हॉर्स रायडिंग क्लबतर्फे प्रति वर्षाप्रमाणे यंदाही अश्वांच्या धावण्याच्या स्पर्धांचे आयोजन गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता वैद्यनाथ महाविद्यालय समोरील मैदान येथे करण्यात आले आहे. अश्वपालकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्लबचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश चौधरी यांनी केले आहे.

या स्पर्धांची सुरुवात १९८० पासून झाली असून या उपक्रमाला मोठी परंपरा लाभली आहे. बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी संदीप बागची यांनीही या स्पर्धेत घोडेस्वारी करत प्रथम क्रमांक पटकावल्याची नोंद

(पान २ वर...)







This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

**हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२–१–५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र – ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.**
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ✻ संपादक : शेख रेहान शेख फेरोज**